वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २०२५ पाने ४ किंमत ३

# मुंबईत सरकारलाच मराठा आंदोलनात दगल घडवायची-मनोज जरांगे पाटील

## उद्या मांजरसुंबा चौकात अंतिम बैठक, जरांगे पाटलांची उपस्थिती

Email.- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email.-editordivyawarta@gmail.com




वडीगोद्री, (दिव्य न्युज):- मराठा आंदोलक मुंबईत यावेत आणि त्यांच्यात दंगल घडून यावी अशी सरकारचीच इच्छा आहे. सरकारच मराठ्यांच्या अंगावर आग फेकू पाहत आहे, असा गंभीर आरोप मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. शनिवारी अंतरवली सराटी येथे प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी हा संशय व्यक्त केला.

जरांगे पाटील म्हणाले की, आम्ही मुंबईकरांना सांगू इच्छितो की, आम्ही शांततेत येणार आहोत आणि शांततेतच आरक्षण घेणार आहोत. कुणीही आडवा येऊ दे, आम्ही मुंबईत जाणारच.. जरांगे यांनी अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, जेव्हा आम्ही शांततेत अंतरवलीत बसलो होतो, तेव्हा आम्हाला मारहाण करण्यात आली. आमच्यातच रक्तपात घडवला गेला. येवल्याच्या लोकांना हाताशी धरून आमच्यातच भांडणं लावली गेली, मग दंगल घडवण्याचा संशय आम्हाला का येऊ नये? ते पुढे म्हणाले, मराठ्यांना कळलं आहे की सरकार जाणूनबुजून मराठ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करत आहे, त्यामुळेच ते संतप्त झाले आहेत. 'पोलिस बघून घेतील' म्हणजे काय? हा दंगल घडवण्याचा दुसरा प्रयत्न नाही तर काय आहे? आम्ही शांततेत मुंबईला येऊ नये का? आझाद मैदानात बसून उपोषण करू नये का?जरांगे पाटील यांनी जाळपोळ आणि दगडफेक करणाऱ्यांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. हे लोक आमच्यात

▶▶ पान २ वर

## आरक्षणाचा प्रश्न संपलेला आहे, मग कशासाठी हा आग्रह?-छगन भुजबळ



मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मनोज जरांगे पाटील हे आपल्या आंदोलनावर ठाम आहेत. दरम्यान यावर आता ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.असं आहे की, त्यांचं ठीक आहे, त्यांची मागणी होती, मराठा समाजाला आरक्षण द्या, ते दिल्या गेले आहे. मराठा समाजाला दहा टक्क आरक्षण देण्यात आलं आहे. मराठा समाजाला देण्यात आलेलं आरक्षण आम्ही टिकवणार असंही मुख्यमंत्री यांनी म्हटलं आहे. त्यामुळे खरं म्हणजे तो प्रश्न संपलेला आहे. मग

▶▶ पान २ वर

## माजी खा. इम्तियाज जलील यांची उद्या माजलगावात जाहीर सभा

### मोठ्या संख्येने उपस्थित राहा-ईद्रिस, युसुफ, सिद्दिखी



माजलगाव, (दिव्य न्युज):- माजलगाव शहरात एमआयएम पार्टीच्या वतीने 'हालातए- हजरा' कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. यानिमित्त रविवार दि. २४ रोजी संध्याकाळी ७ वाजता आंबेडकर चौक, (चुंनुमा चौक) येथे आयोजित जाहीर सभेस माजी खासदार इम्तियाज जलील यांचे मार्गदर्शन लाभणार आहे आहे.तसेच प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर, मा मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला, जिल्हा अध्यक्ष ॲड. शेख शफीक हे सुद्धा मार्गदर्शन करणार आहे, या सभेत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहान मा तालुकाध्यक्ष शेख ईदरिस पाशा, जिल्हा उपाध्यक्ष शेख युसुफ, माजलगाव मतदार संघ प्रभारी सिध्दिख भैय्या यांच्यासह एमआयएम पार्टीच्या

▶▶ पान २ वर

## संस्थाचालक उद्धव कराड, राठोडच्या त्रासाला कंटाळून तरुण कर्मचारी गित्तेने मृत्यूला कवटाळले

### कराडच्या विरोधात तर सततच कर्मचाऱ्यांचे असतात आंदोलन

### चुकीच्या प्रवृत्ती घुसल्याने शिक्षणक्षेत्राचे पावित्र्य धोक्यात



बीड , (दिव्य न्युज):- वडिलांच्या निधनानंतर अनुकंपा तत्वावर नोकरीस लागलेल्या तरुणाला संस्थाचालकाने अपमानास्पद वागणूक दिल्याने ती सहन न झाल्याने टोकाचे पाऊल उचलत त्याने राहत्या घरी गळफास घेऊन मृत्यूला कवटाळल्याची घटना परळी तालुक्यातील नंदागौळ येथे घडली. या प्रकरणात केज येथील साने गुरुजी संस्थेचा उद्धव कराड आणि परळी तालुक्यातील वसंत नगर तांडा आश्रम शाळेचा संजय राठोड या दोन संस्थाचालकांच्या विरोधात परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केज येथील उद्धव कराड याच्या शाळेवरील शिक्षक तर नेहमीच आंदोलन करीत असतात. या संस्था चालकाचे कारभार कसा असेल याचा अंदाज येतो. तर शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात चुकीच्या प्रवृत्ती घुसल्याने शिक्षणक्षेत्राचे पावित्र्य धोक्यात आले असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. तर नुकतीच सरकारी वकीलाच आत्महत्या त्यानंतर या आश्रम शाळेतील कर्मचाऱ्याच्या आत्महत्येने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

श्रीनाथ गोविंद गित्ते ( वय २५ वर्ष) रा.नंदागौळ (ता.परळी ) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. श्रीनाथचे वडील गोविंद गित्ते हे केज येथील साने गुरुजी

पान २ वर

## डोळ्यात चटणी टाकून वडिलांना मारहाण

अंबाजोगाई , (दिव्य न्युज):- कौटुंबिक वादातून मुलाने वडिलांच्या डोळ्यात चटणी टाकून त्यांना मारहाण केल्याप्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना अंबाजोगाई तालुक्यातील राडी तांडा येथे घडली

▶▶ पान २ वर






## तलावात बैल धुण्यासाठी गेलेल्या वृध्द सालगड्याचा पाण्यात बुडून मृत्यू




तलवाडा, (दिव्य न्युज):- आज महाराष्ट्रात परंपरिक नुसार बैलपोळा सण शेतकरी राजा मोठ्या आनंदात उत्साहात साजरा करतो वर्षभर राब राबणाऱ्या बैलाची खांदे मांडणी व संजावट करून बैलपोळा साजरा करण्यात येतो. गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील भेंडटाकळी येथील शेतकरी मोहन वैशिष्ट् लोंढे यांच्याकडे सालाने ठेवलेल्या गडी बिभिषण सुदाम लोंढे (वय वर्षे ५२) बैलाला पोळ्यानिमित्ताने दिं. २२ रोजी - सकाळी आठच्या सुमारास भेंडटाकळी सिंचन तलावात गेला होता ६० ते ७० एकरचा असलेल्या सिंचन आहे . ७० टक्के पाणी असल्याचे बोलले जात आहे.तलावात बैल धुण्यासाठी नेले व ते बैलांना धुवून स्वच्छ करून तळ्या बाहेर आणून सोडले परंतु त्यानंतर स्वतः आंघोळीसाठी बिबिषण सुदाम लोंढे गेले त्यांच्यासोबत त्यांचे दोन नातू लहान लहान सोबत होते परंतु नातू मोबाईलच्या नादात बसलेले होते त्यानंतर आपले आजोबा का दिसत नाही त्यांनी आढावडा केला त्यानंतर

▶▶ पान २ वर

## एकनाथ शिंदेंच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या जिल्हा समन्वयकावर हल्ला

बीड, (दिव्य न्युज):- बीडमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या जिल्हा समन्वयकावर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. या हल्लयात ते गंभीर जखमी असून खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. विलास मस्के असं गंभीर असलेल्या समन्वयकाचे नाव असून मध्यरात्री अज्ञात व्यक्तींनी घरात घुसून विलास मस्के यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्लयादरम्यान मध्यस्थी करणाऱ्या विलास यांच्या बहिणीवर देखील हल्ला झाला आहे. दरम्यान याप्रकरणी पोलिसांनी घटनास्थळाला भेट दिली असून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

या मारहाणीत विलास मस्के गंभीर जखमी असून त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत आहे. धारधार शस्त्राने वार करत ही मारहाण करण्यात आली आहे. बीड जवळील पालवन येथे विलास मस्के यांचे घर आहे. मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास काही

▶▶ पान २ वर




## कामगारांनो, स्वत:ची जबाबदारी समजून महामोर्चात मोठ्या सख्येने उपस्थित रहा-अलिम पटेल

### सोमवारी निघणाऱ्या या मोर्चात आप-आपले व्यवसाय एक दिवसासाठी बंद करून स्वत:साठी द्या



बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्हा आरसीसी बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने कामगारांच्या विविध मागण्यांसाठी २५ ऑगस्ट (सोमवार) रोजी सकाळी ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून निघणाऱ्या कामगारांच्या महामोर्चात सर्व कामगारांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहुन आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयावर धडक मोर्चा आयोजित करण्यात आला असून या कामगार आणि दुकानदार यांच्या महामोर्चात सर्व कामगारांनी सोमवारी आपले काम, व्यवसाय बंद करून आपल्या स्वतःच्या भल्यासाठी या मोर्चात हजारोंच्या संख्येने उपस्थित

▶▶ पान २ वर

## मुस्लिम तरुणाचा मोठा निर्णय!

# आरिफ खानची संत प्रेमानंद महाराजांना किडनी दान करण्याची तयारी

दिल्ली, (वृत्तसेवा):- मध्य प्रदेशातील नर्मदापुरम जिल्ह्यातील एका मुस्लिम तरुणाने संत प्रेमानंद महाराजांना (झीशारपरपव चरहरीरक्ष) आपली किडनी दान करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या तरुणाने महाराजांना पत्र लिहून आपली भावना मांडली असून, या घटनेमुळे सोशल मीडियावर त्याचे कौतुक होत आहे. या तरुणाचे नाव आरिफ खान चिश्ती असून तो इटारसी येथील रहिवासी आहे.

आरिफ खान चिश्ती हा इटारसी (जि. नर्मदापुरम, मध्य प्रदेश) येथील रहिवासी असून तो ऑनलाइन नोकरी करतो. १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेला आरिफ रोज संत प्रेमानंद महाराजांचे प्रवचन ऐकतो. महाराजांच्या साधेपणाने आणि आचार-विचारांनी प्रेरित झाल्यामुळे त्याने हे पाऊल उचलले. आरिफचे तीन भाऊ, पत्नी आणि वडील असून कुटुंबीयांनी देखील त्याच्या या निर्णयाला पाठिंबा दिला आहे.

२० ऑगस्ट रोजी लिहिलेल्या पत्रात आरिफनं म्हटलंय, की मी आरिफ खान चिश्ती, न्यासा कॉलनी, इटारसी, नर्मदापुरम येथे राहतो. तुमचे आचरण आणि वर्तन पाहून मला खूप आनंद होतो. तुमच्या आरोग्याची मला चिंता वाटते. सोशल मीडियावरून मला तुमच्या किडनीबद्दल माहिती मिळाली. तुम्ही हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक आहात. त्यामुळे मी माझी किडनी स्वेच्छेने दान करू



इच्छितो. आज द्वेषाच्या वातावरणात तुमच्यासारखे संत समाजासाठी आवश्यक आहेत. कृपया माझी ही छोटीशी भेट स्वीकारा.

आरिफ खानच्या या निर्णयाचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. त्याच्या या भावनेला अनेकांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे उदाहरण मानले आहे.



बीड : डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिक्य चांदणे यांना वाढदिवसा निमित्ताने शुभेच्छा देतांना शेख निजाम,शेख नसिर,शेख सत्तार इनामदार,शेख रौफ ,इतर मित्र परिवार दिसत आहे.

# शिवराम पाटलांनी गाठलं राळेगणसिद्धी, डोळ्यात डोळे घालून दिली 'वोट चोरीची' माहिती

दिल्ली, (वृत्तसेवा):- काँग्रेस पक्षाचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी वोट चोरीचा मुद्दा उपस्थित करत निवडणूक आयोगाला लक्ष्य केलं आहे. त्यावरुन सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आवाज उठवावा या मागणीचे बॅनर पुण्यात लागले होते. त्यावर माझं वय झालंय आता तरुणांनी पुढे यायला हवं, असे आवाहन अण्णा हजारेंनी केलं होतं. दरम्यान अण्णाचे माजी सहकारी समाजसेवक शिवराम पाटील यांनी थेट राळेगणसिद्धीला जाऊन अण्णांची भेट घेतली. त्यांच्या डोळ्यात डोळे घालून त्यांना 'वोट चोरी ' संदर्भात माहिती दिली.

अण्णा हजारेंची भेट घेऊन आल्यानंतर जळगाव शहरातील सामाजिक कार्यकर्ते शिवराम पाटलांनी माध्यमांशी बोलताना सर्व माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल की त्यांनी या भेटीत अण्णा हजारे यांना राहुल गांधींच्या आंदोलनाची माहिती दिली. तसेच त्यांनी राहुल गांधींच्या या आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहनही अण्णा हजारे यांना केलं आहे. पाटील अण्णांना म्हणाले, देशात पार पडलेल्या निवडणुकांमध्ये मतदानात निवडणूक आयोगाने मोठी हेराफेरी केली आहे. ही हेराफेरी राहुल गांधी यांनी कागदोपत्री शोधून काढली आहे. त्यांनी याचा डॉक्यूमेंट्री पुरावा कोर्टात दिला. एका माणसाला ५० मुले दाखवली. एका घरात त्यांनी ६० लोकं दाखवली. हे सर्व मुद्दे मी आण्णापुढे ठेवले. या गोष्टींना विरोध करावा म्हणून मी आण्णांना विनंती केल्याचं शिवराम पाटलांनी सांगितलं.

पान ४ वरून

## घरात मारलं

कवडगाव, ता. गेवराई ह.मु.पांगरी रोड बीड) या दोघी गावाकडच्या मैत्रिणी. आयोध्या ही काही महिन्यांपूर्वीच होमगार्ड म्हणून भरती झाली होती. तरीही पोलिस होण्याचे स्वप्न असल्याने ती बीडमध्ये राहून तयारी करीत होती. वृंदावणी हिचे एका पुरुषासोबत प्रेमप्रकरण सुरू होते. असे असतानाच त्या पुरुषाची आयोध्यासोबत दीड वर्षापूर्वी ओळख झाली. त्यानंतर त्याने वृंदावणीला बाजूला करत आयोध्याशी बोलणे सुरू केले. आयोध्याचेही पती चार वर्षापूर्वी अपघातात मयत झाले होते. आपल्या प्रियकराने दूर केल्याचा राग वृंदावणीला होता. त्यामुळे १९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता तिने आयोध्याला घरी बोलावून घेतले. दोघीत वाद झाले. ती ओरडत असल्याने तिचा गळा दाबून खून केला. त्यानंतर तिचा मृतदेह एका खोक्यात भरला. आपला नववीच्या वर्गातील मुलगा शाळेतून आल्यावर कचरा टाकायचा आहे, असे म्हणून त्याला दुचाकीवरून शहरापासून उमरद जहांगीर परिसरात नेले. तेथे नाल्यात तो मृतदेह फेकला. गुरुवारी दुपारी साडेपाच वाजता तो मृतदेह हाती लागला. या प्रकरणात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे.

## कोरेगाव भिमा-मोफत

यांच्या माध्यमातून तज्ञ डॉक्टरांकडून ७५ रुग्णांच्या तपासण्या करून निशुल्क महाआरोग्य शिबीर पार पडले.शिबिराच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून आरोग्य तपासणी शिबिराला सुरुवात करण्यात आली. यामध्ये भरपूर खा वजन कमी करा, आहारातून आरोग्याकडे चुकीच्या जीवनशैलीमुळे होणारे आजार शुगर,बीपी,पित्त,थायरॉईड, महिलांना होणाऱ्या अनेक समस्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. रोजच्या धावपळीच्या जीवनात आहार कसा असावा याविषयीं मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी कोरेगाव भिमाचे मा. उपसरपंच दत्तात्रय ढेरंगे, शिरूर खरेदी विक्री संघांचे संचालक सत्यनारायण ढेरंगे,राहुल ढेरंगे, सुवर्णा ढेरंगे,अर्जुन फड,अश्विनी फड,शामल फड,जगदीश सर,बागडे सर, विकास सानप सर,यांनी शिबिरासाठी अथक परिश्रम घेतले.

## मुंबई मोर्चासाठी वडवणी

पाटील यांनी केली. गेल्या वर्षी मुंबई मोर्चा काढला परंतु शासनाने खोटी आश्वासन देऊन मराठा समाजाची फसवणूक केलेली आहे.येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या मोर्चासाठी २७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अंतरवाली सराटी येथे सर्व तयारीनिशी आपण आपली वाहन घेऊन जायचे आहे. त्यानंतर सर्व समाज बांधव मनोज दादांच्या आदेशानुसार मुंबईकडे आगेकुच करणार आहेत.आरक्षण मिळाले तर आपल्या मुलाबाळांना नातवांना या आरक्षणाचा शैक्षणिक नोकऱ्यांमध्ये फायदा होणार आहे.आपली पुढील पिढी सुधारणार आहे.यासाठी एकदम शिस्तीत कोणीही कोणत्याही मार्गाने न जाता सर्वांनी एकत्र एकजुटीने जायचे आहे.सोबत कपडे जेवणाचं खाण्यापिण्याचं नियोन सर्व तयारीनिशी तयारी करण्यात आलेली आहे. प्रत्येक गावातून दोन मराठा सेवक मनोज दादांच्या सुरक्षेसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. जाण्याच्या तयारीसाठी लागणारे झेंडे,पोस्टर,बॅनर्स,भगवे गमजे,टोप्या, अदी साहित्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी करत जोरदार तयारी गावागावातून केली आहे. मिळेल त्या वाहनांची बुकिंग मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली आहे. एक मराठा लाख मराठा, आता कुठे जायचे मुंबईला जायचे,लढेंगे जितेंगे हम सब जरांगे, अभी नही तो कभी नही, अदी घोषणा गावागावातून ऐकायला मिळत आहेत. त्यासाठी मुंबईला जाण्याचा निर्धार ग्रामीण भागातील प्रत्येक गावा गावातून वाडी वस्त्या मोठ्या संख्येने समाज सामील होणार आहे. आरक्षणाची ही शेवटची आणि आरपारची लढाईसाठी सर्व समाज बांधवांनी आपण आपली काम बाजूला ठेवत या भव्य दिव्य मुंबई मोर्चामध्ये सामील होण्या चे आवाहन करण्यासाठी वडवणी तालुक्यातील प्रत्येक गावोगावी खेडोपाडी वाडी वस्त्यावरील सर्व समाज बांधवांनी सामील होण्यासाठी वडवणी तालुका मराठा सेवकानी रात्रीचा दिवस दिवसाची रात्र करत संपूर्ण तालुका पिंजून काढला आहे.जाताना शांततेत कोणालाही त्रास होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यायची आहे. प्रत्येक गावागावातून महिला माता भगिनींनी मुंबईला जाणाऱ्या मावळ्यांना वाट लावण्यासाठी सर्वांनी अंतरवाली सराटी येथे येण्याच्या आवाहनही सकल मराठा समाज वडवणी तालुक्यातील मराठा समाजसेवकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## एजंटांची दिवाळी

उद्योजक, व्यावसायिक, छोटे-मोठे व्यावसायिक, काही शेतकरी, सेवानिवृत्त कर्मचारी, महिला अशा समाजातील सर्वच स्तरातील नागरिकांनीही या कंपनीत गुंतवणूक केली आहे. सध्या त्यांचे भवितव्य अंधकारमय झाले आहे. आपण फसलो गेलो, या विचाराने धास्तावलेल्या लोकांना आता काय करावे, हे सुचेनासे झाले आहे.

कमिशनच्या पैशातून घेतल्या गाड्या, जमिनी अन् सोने

काही एजंट हातात, गळ्यात सोने घालून गोल्ड मॅन झाले होते. त्यांचे राहणीमान पाहून त्यांच्या विश्वासावर अनेकांनी गुंतवणूक केली. कमिशनपोटी मिळालेल्या पैशातून एजंट लोकांनी गाड्या, फ्लॅट, जमिनी, सोने खरेदी केले. आता ते मजेत जीवन जगत आहेत. कंपनीवर कारवाई करतानाच, एजंटांकडून रक्कम वसूल करण्याची मागणी आता होत आहे.

## क्रांतीवीर गणेश

आव्हाड योजना प्रथम क्रमांक क्रांतिवीर गणेश मंडळाचा आला होता २१ हजार रुपये पारितोषिक व सन्मान चिन्ह भेटले होते पोलीस स्टेशन,आमदार चषक अशा अनेक पुरस्काराने सन्मानित तसेच सामाजिक कार्यात मंडळांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आरोग्य शिबिर वृक्षारोपण रक्तदान अशा अनेक कार्यक्रम दरवर्षी आयोजन करण्यात येते याही वर्षे वरील कार्यक्रम आयोजन करण्याचे आयोजिले आहे मंडळाचे सल्लागार दिपकराव मोगरेकर,सतीश गरूड,रामेश्वर धारक, माणिकराव शिंदे, बंडूराव कोंबडे, महादेव कोंबडे, प्रशांत खोले, खंडू देवकते, नितीन गरूड,दत्ता शिंदे, दिनेश रांजवण,सिद्धेश्वर धारक,बंटि ललवाणी,पप्पु गायगवे,अक्षय कडतन,मदन राऊत, सिद्धेश्वर काळजे, किशोर काळजे,पांडुरंग कुलथे,अरबाज पठाण,दिलवर खान, गणेश उबाळे,अक्षय धारक,योगेश कुलथे,रामा शिंदे,प्रकाश भागवत, सचिन करडे,रामा जूनाळ,आकाश कोंबडे,प्रशांत गायगवे,रामा काळजे,मयूर देवकते, अशोक कोंबडे, अरिहंत ललवाणी,कृष्णा इतापे, राहुल तांदळे, शहाजी सरक,शशिकांत टाक, लखन नाईकवाडे,राहुल दळवी, प्रमोद शिंदे,अमोल धारक,सुमित राऊत,अभिषेक धारक,अवधूत लिंगशेकर, गोविंद राऊत,श्याम गायगवे,आदित्य नाईकवाडे,दिगांबर शिंदे, किशोर गर्जे, गजानन बावणे,अशोक कुलथे,अजित सावंत,वैभव रांजवण,मेघराज सोळंके, गणेश मोगरेकर,वरद धारक,आशिष कोंबडे,विशाल शिंदे,ओमकार गरूड.आदी सभासद उपस्थित होते

पान १ वरून

## मुंबईत सरकार

घुसून घोषणा देतील. त्यांचेच लोक देवेंद्र फडणवीस यांना शिव्या देतील. जाळपोळ आणि दगडफेक करणारे आमचे नाहीत. पोलिसांनी त्यांना ताबडतोब पकडावे, असेही जरांगे म्हणाले.

मुंबई न्याय देणारी भूमी

आम्ही न्यायासाठी मुंबईत येत आहोत. उलट, तुम्ही आम्हाला पाणी दिलं पाहिजे. मुंबई ही न्याय देणारी भूमी आहे, असे जरांगे यांनी सांगितले. २९ ऑगस्टला आंदोलनाला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. गणेशोत्सव आपल्या धर्माचा आहे. आम्ही आमच्या लेकरांच्या कल्याणासाठी मुंबईत येत आहोत. मुंबई ही न्याय देणारी भूमी आहे. गणेशोत्सव आणि आंदोलनाचा काहीही संबंध नाही. आम्ही उत्सवाचा आनंदही घेऊ, असे ते म्हणाले.

सरकारचे लोक काहीही बातम्या पसरवतात

ते म्हणाले की, आम्ही आमचे गणपती बाप्पा तिथेच आणत आहोत आणि मुंबईकर आणि ग्रामीण महाराष्ट्रातील लोक एकत्र येत असल्याने असा सोहळा जगात कधीच होणार नाही. आम्ही मराठे हिंदूंचे सगळे संस्कार पाळतो आणि वारकरी संप्रदायाचे पालन करतो. गणेशोत्सव आमच्या मुलांच्या सुखासाठी आहे, आणि आरक्षणही मराठ्यांच्या मुलांच्या सुखासाठी आहे. सरकारचे लोक काहीही बातम्या पसरवतात, असेही जरांगे म्हणाले. मुंबईकरांना प्रश्न विचारताना ते म्हणाले, आमची काय चूक आहे? आम्ही तुमचीच लेकरं आहोत. गरिबांची लेकरं तुमच्या दाराशी येत आहेत. चार महिन्यांपूर्वी जेव्हा मुंबईला जाण्याची तारीख ठरली, तेव्हा गणेशोत्सव आहे, याची कल्पना नव्हती, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## आरक्षणाचा प्रश्न

कशासाठी हा आग्रह? हे कळण्याच्या पलिकडचं आहे, असा हल्लाबोल भुजबळ यांनी यावेळी जरांगे पाटील यांच्यावर केला आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की, बाकीच्या काही गोष्टी आहे त्यावर आपण विचार केला पाहिजे. सारथी, बार्टी, महाज्योती या सारख्या संस्था आहेत. ज्या गोष्टी सारथीच्या माध्यमातून मिळतात त्यातील अनेक गोष्टी महाज्योतीच्या वाट्याला आलेल्या नाहीत. म्हणून मी मंत्रिमंडळात नेहमी सांगत असतो, ओबीसीची संख्या मोठी आहे, त्यांना किमान समान वागणूक द्या. विद्यार्थ्यांना हे कळत नाही की पैसे कोण देतं? आदिवासी आणि दलित समाजाला दिल्लीतून पैसे येतात, विद्यार्थ्यांना एवढंच माहिती असतं की सरकार पैसे देतं, मात्र आम्ही या गोष्टी विद्यार्थ्यांना नाही सांगू शकत. मग त्यांच्या मनात असा प्रश्न निर्माण होतो, त्याला देतात मग मला का देत नाही, असं भुजबळ यांनी यावेळी म्हटलं.

मुख्य सचिवांनी याच्यात लक्ष देऊन सर्वांना समान वागणूक कशी मिळेल ते बघावं असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलेलं आहे. चांगलं काम चाललेलं आहे. मराठी विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न सोडवले गेले आहेत. पावसामध्ये, गणपती उत्सवामध्ये हे काय करणार आहे? मला काही कळत नाही. लोकांना का त्रास देतायेत? त्यांचं जर हेच म्हणणं असेल की ओबीसीमधून आरक्षण पाहिजे, तर चार आयोगांनी आरक्षण नाकारलेलं आहे. सुप्रीम कोर्टानेही फार मोठा जजमेंट दिलेलं आहे, असं भुजबळ यांनी म्हटलं आहे.

## कामगारांनो, स्वतःची

राहण्याचे आवाहन बीड जिल्हा आरसीसी बांधकाम कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अलिम पटेल यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील आरसीसी बांधकाम कामगार, खोदकाम करणारे कामगार, प्लास्टर करणारे कामगार, फर्शी बसविणारे कामगार, लाईट फिटींग करणारे कामगा, कलर कामगार, सुतार कामगार, पीयुपी कामगार, प्लंबिंग कामगार, फ्रॅब्रीकेशन कामगार आदींसह विट विक्रेते, सिमेंट विक्रेते, खडी विक्रेते, लोखंड विक्रेते, फर्शी विक्रेते, जेसीबी चालक-मालक, हायवा चालक-मालक, ट्रॅक्टर चालक-मालक यांनी या महामोर्चात सहभागी होवून मोर्चा यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. यासाठी या महामोर्चासाठी गेल्या आठ ते दहा दिवसापासून आरसीसी बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने तयारी सुरू असून शहरात आणि ग्रामीण भागात कॉर्नर बैठका, छोटे मेळावे आणि व्यक्तिगत गाठी भेटीवर भर दिला जात आहे. पोस्टर, बॅनर्स, झेंड्यासह बीड शहरात जनजागृती करण्यासाठी ऑटो रिक्षावर अनाउंसींग सुध्दा सुरू आहे. उद्या या महामोर्चाच्या संदर्भात जीएन फंक्शन हॉल येथे दुपारी २ वाजता आणि सायंकाळी ८ वाजता तेलगाव नाका परिसरात बैठकीचे आयोजन ही करण्यात आलेले आहे. तरी सर्व कामगार बांधवांना आणि व्यवसायकांना आवाहन करण्यात येते की, सोमवारी दि.२५ ऑगस्ट रोजी स.११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ जमा होवून मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन आरसीसी बांधकाम कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अलिम पटेल यांनी केले आहे.

## माजी खा. इम्तियाज

वतीने करण्यात आले आहे भारतीय जनता पार्टीचे सरकार अस्तित्वात आल्यापासून जातिवाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. जाणून बुजून जाती धर्मात वाद निर्माण केल्या जात आहे. अशा स्थितीत मुस्लिम समाज मन दोलायमान आहे. यावर भाष्य करण्यासाठी ऑल इंडिया मजलीस ए-इत्तेहादुल पार्टीच्या वतीने 'हालात-ए-हजरा' कार्यक्रम ठेवण्यात आला आहे' यानिमित्त शहरातील (आंबेडकर चौक) चुनुमा चौक , पावर हाऊस रोड, राजस्थान मंगल कार्यालय येथे रविवार दि. २४ रोजी संध्याकाळी ७ वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेस प्रमुख मार्गदर्शन एमआयएम पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष माजी खा. इम्तियाज जलील यांचे मार्गदर्शन लाभणार आहे यावेळी प्रदेश सरचिटणीस समीर साजिद बिल्डर, मा मराठवाडा अध्यक्ष फिरोजलाला मा जिल्हा अध्यक्ष ड शेख शफिक भाऊ बीड , आसाराभाई एमआयएम नेते, यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या जाहीर सभेत उपस्थित राहण्याचे आवाहन माजलगाव तालुका एमआयएम पार्टीच्या वतीने तालुकाध्यक्ष शेख इद्रीस पाशा, जिल्हा उपाध्यक्ष शेख युसुफ, सिद्दिकभाई (धारूर) शेख युनूस (पात्रुड), मौलाना फारुख, हाफेज फारुख, शेख राजू, शेख अन्सर, कलीम कुरेशी, सत्तार पठाण, शेख समीर, शेख इरफान बब्बूभाई इत्यादींनी केले आहे.

## संस्थाचालक उद्धव कराड,

आश्रम शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. २०१० मध्ये त्यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यानंतर २०१६ पासून गित्ते कुटुंब श्रीनाथ याला अनुकंपा तत्वावर नोकरीस घ्यावे अशी विनंती साने गुरुजी आश्रम शाळेच्या उद्धव कराड यांच्याकडे करत होते. परंतु हाताला खाज असलेल्या उद्धव कराड याने गित्ते कुटुंबाची विनंती मान्य न करता त्यांना अपमानास्पद वागणूक दिली. यानंतर गित्ते कुटुंबाने प्रशासन दरबारी पाठपुरावा करत परळीत असलेल्या वसंत नगर तांडा येथील आश्रम शाळेत नियुक्तीची ऑर्डर मिळवली. परंतु येथेही कराड प्रमाणेच संस्थाचालक संजय राठोड याने देखील गित्ते कुटुंबाला त्रास दिला. तसेच श्रीनाथ याला अपमानास्पद वागणूक देत अतिरिक्त काम करण्यास भाग पाडले.या सर्व प्रकाराचा ताण सहन न झाल्याने श्रीनाथ याने टोकाचे पाऊल उचलत शुक्रवारी दि. २२ ऑगस्ट रोजी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात संजय राठोड व उद्धव कराड या दोन संस्थाचालकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिकचा तपास परळी ग्रामीण पोलिस करत आहेत. तर काही संस्था चालक कर्मचाऱ्यांनी पिळवणूक करीत त्रास देत असल्याचे यातून दिसून येत असल्याने अशा संस्था चालकांवर शिक्षण विभागाने कठोर कारवाई करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. तर ज्या संस्था चालकांच्या विरोधात कर्मचारी,शिक्षक आंदोलन करीत असतात त्याची प्रशासनाने दखल घेऊन चौकशी करीत योग्य ती कारवाई करावी अन्यथा अशा घटना घडतच राहतील अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## तलावात बैल धुण्यासाठी

गावातील ग्रामस्थ जमा झाले हा प्रकार समोर आला या पाणी जास्त असल्यामुळे व या सिंचन तलावाचा गाळ उपसा करण्यात आला होता दोन ते तीन-तीन परस मोठे खड्डे असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर यांना गावकऱ्यांनी दिली तात्काळ घटनास्थळी कर्मचारी दाखल झाले होते त्यानंतर अग्निशामक दल बीड, गेवराई , यांची टीम दाखल झाली होती सलंग सहा ते सात तास शोधा शोध मोहीम राबवली परंतु अखेर या व्यक्तीचा शोध लागला नव्हता २३ रोजी दुसऱ्या दिवशी तीस तासानंतर बिभिषण सुदाम लोंढे यांचामृतदेह सापडला आहे. हे मृतदेह सावरगाव येथील भुयरी व्यक्तीने काढला आहे.त्याच्या कुटुंबात दोन मुली,जावाई,दोन मुल आहेत जातेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात सविच्छेदन करण्यात आले अंत्यविधी भेंडटाकळी येथे करण्यात आले आहेत गावातील नागरिक यांनी मोठी गर्दी केली होती भेंडटाकळीगावात बैल पोळा सण गावकऱ्यांनी साजरा केला नाही लोंढे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

## एकनाथ शिंदेंच्या वैद्यकीय

अज्ञात टोळक्यांनी घराचा दरवाजा ठोकून त्यांना बाहेर काढलं.

याच वेळी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला आहे. विलास मस्के हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बीड मधील वैद्यकीय मदत कक्षात गेल्या तीन वर्षांपासून काम पाहत आहेत. दरम्यान हल्लेखोरांना अटक करून कारवाई करावी अशी मागणी विलास मस्के यांच्या नातेवाईकांनी केली आहे.

## डोळ्यात चटणी टाकून

असून फिर्यादी संजय जयराम चव्हाण (वय ४५, रा. राडी तांडा, अंबाजोगाई) यांनी पोलिसात तक्रार नोंदवली आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घरगुती वादातून संजय चव्हाण यांचा मुलगा अनिकेत याने वडिलांच्या डोळ्यात चटणी टाकून, हातातील वायरने पाठ, अंगावर तसेच पायावर मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी जखमी झाले असून कानावर व मानेला दुखापत झाली. यावेळी पुतळाबाई सखाराम आडे यांनी मध्यस्थी करून हाणामारी थांबवली.या प्रकरणी अनिकेत संजय चव्हाण याच्यावर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार राजेंद्र नन्नावरे हे करीत आहेत.